# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. ०६ जून २०२२

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५७/२०२२ भादंविसक ४२० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २०/०४/२०२२ रोजी पासुन ते दि. ०४/०६/२०२२ रोजी पर्यंतचे दरम्यान, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/०६/२०२२ रोजी १५.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिमा रामानंद जवळकर, वय- ४२ वर्षे, व्यवसाय- मार्केटिंग बिझनेस, रा. घर नं. ए-३८, अभिषेक नगर, अँबेसिटर हॉटेलच्या पाठीमागे, जुना पुना नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | Dani Data APK For Android Free Download ॲप चा अज्ञात धारक |
| **फसवणुक रक्कम** | : | १,९३,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीस टेलिग्राम चॅनेलवरुन Dani Data APK For Android Free Download हे ॲप डाऊनलोड करण्यास सांगुन, त्याव्दारे डिपॉजिट केले तर ०.७५% कमिशन व दुसऱ्या व्यक्तीला रेफर केले तर त्यांचे नफ्यातुन १० ते १५ टक्के कमिशन देण्याचे आमिष दाखवून, वरील आरोपीताने फिर्यादीस सुरुवातीस कमिशन देवून त्यानंतर सदरचे ॲप व टेलीग्राम लिंक बंद करुन, फिर्यादीने ज्यांना रेफर केले होते असे इतर ८ लोक व फिर्यादी यांची मिळुन एकुण १,९३,०००/- रु ची फसवणुक केली आहे म्हणून फिर्यादीची Dani Data APK For Android Free Download चे धारक विरुध्द कायदेशीर तक्रार आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १३६ चौगुले - ७२१८५३९१५० |

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५९/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०५/०६/२०२२ रोजी १९.१५ वा ते २१.१५ वा चे दरम्यान, हिराचंद नेमचंद वाचनालयासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/०६/२०२२ रोजी १६.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | जगन्नाथ बुधप्पा अष्टेगी, वय- ६८ वर्षे, व्यवसाय- पिग्मी एजंट, रा. सिध्देश्वर हौसिंग सोसायटी, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १०,०००/- रु एक हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा मुलगा प्रदिप हा फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं एम एच १३ सी एफ २८१७ ही वरील ठिकाणी पार्क करुन किल्ला बागेत जावून परत येवून पाहिले असता फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल ही मिळुन आली नाही. आजुबाजुस गाडीचा शोध घेतला असता मिळुन आली नाही. तरी यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल ही फिर्यादीच्यासंमतीवाचून चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- सफौ/ भुर्ले |